Vol 6 Issue 11 Dec 2016

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

Indian Streams Research Journal

ISSN: 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 11 | December - 2016

# प्रा. कुमुदताई हिरुरकर यांनी निबध्द केलेल्या 'शिवरंजनी' या रागातील बंदिशींचे सांगीतिक समिक्षण

प्रा.डॉ.स्नेहाशिश ज.दास[1] , श्री.दिपक भा.चौधरी[2]

[1]संगीत विभाग प्रमुख,महिला महाविद्यालय, अमरावती .

[2]अंबा कॉलनी, अमरावती .

**सारांश :—**

सौंदर्यवर्धक गोष्टींनी शहराची शोभा वाढत असते. परंतु संगीत आणि साहित्य यामुळे त्या शहराला संस्कृती प्राप्त होते. संगीत संस्कृतीच्या विदर्भातील घडणीमध्ये कुमूदताईंचा सिंहाचा वाटा आहे. आपल्या जीवनातील 61 वर्षे त्यांनी संगीत सेवेला अर्पण केले आहेत. वयाच्या 22 व्या वर्षापासून त्यांनी संगीत शिक्षा संपादन व शिकविण्याचे कार्य हाती घेतले आहेत. आज त्या 83 वर्षांच्या आहेत.

कुमूदताईंनी त्यांच्या या संगीत सेवेच्या काळात आपल्या अमूल्य मार्गदर्शनातून अनेक विद्यार्थी तसेच शिक्षक सुध्दा घडविले. ताईंनी फक्त गाणारा वर्ग तयार केला असे नाही तर त्यांच्या सहवासाने शास्त्रीय संगीत ऐकणारा मोठा श्रोता वर्ग निर्माण झाला. ताईंनी अनेक भक्तिगीते, देशभक्ति गीते, तसेच काही रागांमध्ये बंदिशी लिहिल्या व त्या स्वरांमध्ये बांधल्या आहेत. त्यांच्या या रचनांमध्ये स्वर, लय आणि भाव यांचा सुंदर मेळ त्यांनी साधला आहे. त्यांनी रचलेला 'शिवरंजनी' या रागातील बंदिशीचे समिक्षण करण्याचा प्रयत्न येथे करण्यात आला आहे.

**प्रस्तावना :—**

भारतीय संगीत हे जगातील अतिशय प्राचिन संगीत मानले जाते. त्याची निर्मिती निसर्गातून झाली असे मानतात. मानवाला जेव्हा शब्द आणि सूर गवसले तेव्हा त्यातून संगीत कलेचा जन्म झाला. ही संगीत कला प्रगत होत असतांना त्याच्यामध्ये स्वर, लय, शब्द आणि ताल अशा अनेक घटकांचा समावेश होऊन संगीत



समृध्द झाले. संगीतामध्ये स्वरतत्व, लयतत्व, शब्दतत्व यांच्या एकत्रिकरणातून गेयबंध निर्मित झाला आणि त्यालाच आपण 'बंदिश' असे संबोधतो. बंदिश आणि इतर रचना या दोन मध्ये फरक करायला हवा. एखाद्या कलेची चौखट व्यवस्थितपणे सांभाळून तयार केलेली रचना म्हणजे 'बंदिश'. परंतु एखाद्या कलाकाराच्या अभिव्यक्तीसाठी त्याने केलेला स्वर, ताल, शब्दांचा संयोग म्हणजे इतर रचना होईल. 'बंदिश' या शब्दातच त्याचे स्वरूप स्पष्ट होते. विशिष्ट रागातील स्वर घेऊन एखाद्या तालामध्ये शब्द आणि स्वरांचा मेळ घालून केलेली रचना म्हणजे 'बंदिश'. बंदिशीला एक आंतरिक लय असते. ती वेगवेगळया तालात बांधलेली असते, ही बाब वेगळी. परंतु तालावर प्रत्यक्ष न गाता नुसती गायली तरी एक लय त्याला प्राप्त असते आणि किंबहुना म्हणूनच तिला बंदिश म्हणतात.

कुमूदताईंनी बांधलेल्या 'शिवरंजनी' या रागातील बंदिशीचे शब्द, स्वर, मुखडा, सम तसेच लय या निकषांवर अध्ययन करु या –

राग – शिवरंजनी

ताल – त्रिताल (मध्य)

स्थायी – बिनती मोरी मान श्याम सुंदरवा

परुं तोरे पैय्याँ जाने दे घरवा

अंतरा – जाने कैसे कैसे लोगवा बोले

हठ छोड छोड अब बिलम भईलवा

**• साहित्यीक मूल्ये व षब्दांची निवड :—**

या मुद्दयांचा विचार करतांना बंदिशीतील साहित्यिक मूल्ये म्हणजे भाषालंकाराचा उपयोग वैचारिक प्रगल्भता आणि त्यानुसार केलेली शब्दांची निवड या अनुषंगाने विचार करावा लागेल. संगीताचे मुख्य अंग 'स्वर' व दुसरे अंग 'शब्द' आहे. कंठ संगीताचा पाया हा गीत किंवा बोल असतो. याच पायावर रागरुपी भवन उभे राहते. संगीतशास्त्रींनी 'पद' हे संगीताचे बाह्यतत्व आहे असे कधीच मानले नाही. बंदिशीतील शब्दांमुळे राग गायनाला समृध्दता येते. कंठ संगीतात कंठातून निघणाऱ्या संगीतोपयोगी नादास पूर्णत्व येण्यासाठी वर्णाक्षरांची गरज असते. ती वर्णाक्षरांची गरज काव्याक्षरांतून पूर्ण होते. प्रस्तुत बंदिशीच्या काव्यामध्ये ब्रज भाषेचा सुंदर उपयोग केलेला आहे. भारतीय साहित्यात संस्कृत भाषेनंतर ब्रज भाषेला स्थान आहे. या भाषेत गोडवा आहे. कोमल रस आणि सुंदर अभिव्यक्ती त्यात आहे. याच कारणांमुळे 'रामचरितमानस' या सारखे काव्य वाचकांना आकर्षित करुन घेतात. कुमुदताईंनी आपल्या बहुतेक बंदिशी याच भाषेत लिहिल्या आहेत. कुमुदताईंनी बंदिशीतील साहित्याचे महत्व ओळखले आणि आपल्या बंदिशीमध्ये स्वर, ताल, लय यांच्याइतकेच शब्दांनाही त्यांनी महत्व दिले.

**• काव्यार्थ :—**

करुणरस व श्रृंगाररस यांचे सुंदर मिश्रण 'शिवरंजनी' या रागात आहे. याला अनुसरुन ताईंनी एका गवळणीची कृष्णाला केलेली आर्त विनवणी या बंदिशीच्या काव्यात साकारली आहे. श्रीकृष्णाने गवळणीला वाटेत अडविले आहे आणि हि गवळण त्या कृष्णाला विनंती करत आहे ''हे सावळया सुंदर कृष्णा, मी तुझ्या पाया पडते, मला तू घरी जावू दे.''पुढे ती म्हणते, '' हे कृष्णा तुझ्या अश्या वागण्यामुळे सर्व लोक मला नाही नाही ते बोलत आहे, आता तुझा हा हट्ट सोड. मला घरी जायला उशीर होत आहे'' प्रस्तुत बंदिशीच्या काव्यामध्ये श्रीकृष्णाच्या नटखट लीलेचे वर्णन झालेले आहे. एका गवळणीने कृष्णाला केलेल्या विनंतीचा उत्तम परिपोष येथे झाला आहे. यात श्याम आणि पैय्या ही दोन जोडाक्षर युक्त शब्द आलेली आहेत. परंतु ब्रज भाषेची हीच सुंदरता आहे. यातील जोडाक्षरे सुध्दा उच्चार सुलभ असल्यामुळे हे शब्द गातांना कुठल्याही प्रकारचा अडथळा येत नाही. या बंदिशीचे काव्य हे सामान्य

 Volume - 6 | Issue - 11 | December - 2016

श्रोत्यालाही सहज समजण्यासारखे आहे. आलाप गायनाच्या सोयीसाठी स्थायीच्या पहिल्या ओळीत 'मान' हा आकारयुक्त शब्द समेच्या ठिकाणी योजन्यात आला आहे. एक बंदिश आणि गायनाभिव्यक्तीच्या स्तरावर हे काव्य उत्तम आणि दर्जेदार आहे.

### • *स्वर सौंदर्य :–*

साहित्यकारांनी रस सिध्दांतामध्ये नवरस सांगितले आहे. संगीतज्ञांनी राग आणि रस यामधील संबंध मान्य केले असून श्रृंगार, करुण, शांत, वीर इत्यादी रस यामध्ये समाविष्ट आहेत. ज्या प्रकृतिचा राग असेल, ज्या प्रकारचा भाव त्या रागांच्या स्वरांमधून येत असेल, त्याच प्रकारची बंदिश रचना त्या भावाला पोषक अशीच असली पाहिजे. हाच नेमका विचार या बंदिशीमध्ये दिसतो. शिवरंजनी राग हा करुण आणि श्रृंगाराचे प्रतिक आहे. या मधील कोमल गंधार आणि धैवत हे स्वर करुण भाव निर्माण करतात. हा भाव या रागाच्या बंदिशीत म्हणजेच शब्दात आहे, म्हणून ही बंदिश अधिक परिणामकारक आहे. या बंदिशीच्या स्वररचनेमध्ये राग शिवरंजनी दर्शक स्वर पुढीलप्रमाणे आहे.

1) पहिल्या ओळीत – ग रे सा, ध सा ग रे ,<br>
रे ग प ध प ग, रे ध सा.<br>
2) दुसऱ्या ओळीत – रे ग ध प, प ध सां ,<br>
ध प ग<br>
3) तिसऱ्या ओळीत – प प सां ध सां हा तार<br>
षड्जावर जाणारा स्वर समूह<br>
सां रें गं रें सां, सां, ध प.<br>
4) चवथ्या ओळीत – रे ग ध प, प ध सां ध,<br>
ध प ग प, ग प ध, प ग

वरील विश्लेषणावरुन हे लक्षात येते की, ताईंनी शिवरंजनी हा राग येथे प्रभावीपणे मांडला आहे. राग नियमांचे विचारपूर्वक पालन या बंदिशींच्या रचनेत केलेले दिसत आहे.

### *आरोह – अवरोह :–*

बंदिशीतील स्वर–रचनेचा अभ्यास केल्यास पुढील प्रमाणे आरोह– अवरोह दिसून येतात.

आरोह – सा रे ग प, ध प, ग प ध सां.<br>
अवरोह – सां ध प, ग रे सा, रे ध सा.

वरील आरोह आणि अवरोहावरुन या रागात मध्यम व निषाद हे स्वर वर्जीत आहेत हे स्पष्ट होते. ज्यामुळे या रागातील स्वरांची संख्या पाच आहे असे दिसून येते. यावरुन हा राग औडव–औडव जातीचा आहे. गंधाराचे कोमल स्वरुप आणि ईतर स्वर शुध्द स्वरुपाचे आलेले दिसतात.

### *स्वर प्राधान्य :–*

प्रस्तुत बंदिश मध्यलयीतील छोटा ख्याल असून, ताल त्रितालामध्ये निबध्द करण्यात आली आहे. स्थायीची दोन आवर्तने आणि अंतऱ्याची दोन आवर्तने अशा चार आवर्तनातुन म्हणजेच 64 मात्रावकाशांमध्ये प्रस्तुत बंदिश अभिव्यक्त होते. या 64 मात्रावकाशांपैकी या रागात लागणाऱ्या प्रत्येक स्वराला किती मात्रावकाश मिळाला हे खालील दिलेल्या तक्त्यावरुन कळून येईल.

### *राग.शिवरंजनी ताल – त्रिताल (मध्य)*

#### *स्थायी*

| | | | |
|---|---|---|---|
| | | रे | ग रे रे ध |
| | | बि | न ती मो री |
| स – – सा | गरेरे सारेग प प | (ग)ध प ग रे | रे ग ध ध |
| मा ऽ ऽ न | श्याऽऽ ऽऽऽ म सुं | द र वा प | रूं तो ऽ रे |
| ध – प – | धसां – ध प | ग (प) ग | |
| पै ऽ य्यॉ ऽ | जाऽ ऽ ने दे | घ र वा | |
| X | २ | 0 | ३ |

#### *अंतरा*

| | | | |
|---|---|---|---|
| | | प | प सांध सांध सांध |
| | | जा | ने कैऽ ऽऽ सेऽ |
| सां – सां – | सां ध सारें गंरे | सं सांध (ध)प रे | रे ग ध ध |
| कै ऽ से ऽ | लो ग वाऽ ऽऽ | बो ऽऽ ले ह | ठ छो ऽ ड |
| ध प प प | ध सां ध प | गप धप ग | |
| छो ड अ ब | बि ल म भ | इऽ लऽ वा | |
| X | २ | 0 | ३ |

*रागातील प्रत्येक स्वराला मिळालेला मात्रावकाश –*

| स्वर / ओळ | सा | रे | ग | प | ध | मात्रा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | $4\frac{1}{3}$ | 4 | $2\frac{2}{3}$ | 3 | 2 | 16 |
| 2 | $1\frac{1}{2}$ | 2 | 3 | 4 | $5\frac{1}{2}$ | 16 |
| 3 | $8\frac{1}{2}$ | 1 | $\frac{1}{2}$ | 3 | 3 | 16 |
| 4 | 1 | 2 | $2\frac{1}{2}$ | 5 | $5\frac{1}{2}$ | 16 |
| एकूण | $15\frac{1}{3}$ | 9 | $8\frac{2}{3}$ | 15 | 16 | 64 |

**स्वर प्राधान्य**

| स्वर | मात्रावकाश |
|---|---|
| सा | $15\frac{1}{3}$ |
| रे | 9 |
| ग | $8\frac{2}{3}$ |
| प | 15 |
| ध | 16 |

प्रत्येक स्वराला दिलेल्या मात्रावकाशाच्या अभ्यासावरुन हे लक्षात येते की, परंपरेने सांगीतलेला पंचम हा वादी स्वर प्राधान्य क्रमाने येथे तिसऱ्या क्रमांकावर येतो व परंपरेने सांगीतलेला षड्ज हा स्वर येथे परंपरेनुसारच दुसऱ्या क्रमांकावर येतो. इतर संगीतज्ञ, गायक आणि कलावंत या रागाचा वादी स्वर पंचम व संवादी स्वर षड्ज मानतात. परंतु या बंदिशीने वादी स्वरा बद्दल आपली वेगळी भुमिका मांडल्याचे वरील मात्रावकाशाच्या तक्त्यावरुन स्पष्ट होते.

वरील स्वर प्राधान्याच्या विश्लेषणावरुन हे लक्षात येते की, प्रत्येक रागाच्या घडणावळीत प्रधान स्वर आणि उपप्रधान स्वर असणे जसे अनिवार्य आहे. तसेच साधारण प्राधान्याचे स्वर तसेच अल्प आणि अत्यल्प स्वर हे सुध्दा अती महत्वाचे असते.

*मुखडा आणि सम :–*

*मुखडा :–* कोणत्याही बंदिशीचा मुखडा हा त्या बंदिशीचा चेहरा असतो. प्रत्येक व्यक्तीच्या चेहऱ्यावर त्या व्यक्तीच्या मनात चालू असलेले विचार विविध रुपाने व्यक्त होत असतात. यामुळे त्या व्यक्तीच्या स्वभाव रचनेची एक प्रतिमा आपल्या मनात निर्माण होते. तसेच एखाद्या रागाची बंदिश ही त्या रागाच्या पुर्ण व्यक्तिमत्वाचे संकलित रुप असते, आणि त्या व्यक्तिमत्वाचा चेहरा म्हणजे मुखडा. बंदिश निर्मितीतील सर्व घटकांचा विकास होण्याकरिता मुखडा आकर्षक असणे आवश्यक असते. मुखडयाची आकर्षकता ही तालांच्या मात्रांचा उपयोग, राग स्वरुप निर्माण करणारे स्वर आणि योग्य शब्दांचा वापर या तीन घटकांवर अवलंबून असते. प्रस्तुत बंदिशीमध्ये या तीनही घटकांचा पूरेपूर उपयोग केलेला आहे. ही बंदिश त्रितालात बद्ध केलेली असून, या तालातील कालापासून आलेल्या धा तीं तीं या मात्रांमध्ये आपल्याला एक प्रकारची उठान दिसून येते. याचा सुंदर उपयोग या बंदिशीत करण्यात आला आहे. धा तीं तीं या नंतरच्या 12 व्या मात्रेपासून या बंदिशीचा मुखडा येथे बांधण्यात आला आहे. शब्दरचनेचा विचार केला असता बंदिशीतील काव्यात एक गवळण, श्री कृष्णाला विनंती करत आहे. तेव्हा मुखडयामध्येच 'बिनती मोरी' या शब्दाचा उपयोग करुन बंदिशीच्या काव्याची उत्सुकता वाढवून 'मान' या शब्दावर सम दाखविली आहे.

*सम :—*

'सम' हा बंदिशीचा महत्वाचा बिंदू मानला जातो. तो एक उत्कर्षबिंदू असतो, तसेच त्याला विसर्जन बिंदूही म्हणता येईल. कारण समेवरुन बहुतेक वेळेला रागालापाची सुरुवात होते व यावरच सांगता देखील होते. सम ही तिच्या आधीच्या स्वरवाक्याची क्रिया आणि मुखडा बांधण्याची क्रिया या दोन्ही नंतरची पुर्तता दर्शविते. नविन स्वरवाक्यातून रागविचार मांडण्याच्या क्रियेची सुरुवात करण्याचा संकेत देते. प्रस्तुत बंदिशीमध्ये नवीन स्वरवाक्य निर्मितीसाठी समेची योजना संवादी स्वरावर करण्यात आली. यामुळे नवीन स्वरवाक्य निर्मितीमध्ये आपोआप संवादी स्वराचा वादी स्वराशी सुसंवाद होऊन आकर्षक, रागचलनाशी निगडीत स्वरवाक्य निर्माण होण्यास मदत होते. समेचा विचार करतांना वादी— संवादी, रागरुप , रागचलन यांच्या बरोबरीने काव्याचा आशय व्यक्त होण्याकडे सुध्दा काळजीपूर्वक लक्ष देण्यात आले आहे. गवळणीने कृष्णाला केलेली विनंती अगदी प्रभावी पणे समेतून दाखविण्यात आली आहे. 'बिनती मोरी' या शब्दांनंतर सम 'मान' या शब्दावर योजीली आहे.

*लय सौंदर्य :—*

'काल' (Time) या संकल्पनेच्या अंतर्गतच संगीताचे मुळ स्वरुप समाविष्ट आहे. जगातील कुठल्याही संगीताला Art of Time असे म्हटले जाते. नुसत्या लयीला अथवा तालाच्या आघाताला संगीत म्हणता येणार नाही, तर निरनिराळया स्वराकृतींनी, निरनिराळया शब्दांकृतींच्या गतींनी स्वरबंधनाला अथवा गायनाला एक रेखीव आकार येत असतो, जी प्रमाणबध्दता येत असते, तीलाच लय असे म्हणतात. संगीतातील प्रत्येक गोष्ट, प्रत्येक प्रकार हा लयबध्द असतो. प्रत्येक स्वर आणि आलाप हा लयीशिवाय होऊच शकत नाही.

प्रस्तुत बंदिश मध्यलय त्रितालात निबध्द असून, बंदिशीचा उठाव 12 व्या मात्रेपासून आहे. त्यामुळे या बंदिशीतील प्रत्येक ओळीतील मात्रा प्रवास पाच ते अकरा असा होतो. यातील अंतऱ्याचा उठाव देखील बाराव्या मात्रेपासून आहे. बाराव्या मात्रेपासून उठाव असल्यामुळे उठावाच्या दृष्टीने खास वैशिष्ट असलेल्या असामान्य बंदिशीत हिची गणना होते. बंदिशीच्या अंतर्गत लयीचा अभ्यास केला असता, या बंदिशीच्या स्वर योजनेत बहुतेक स्वर एकपटीच्या लयीत आहेत. काही ठिकाणी दोन मात्रांमध्ये एक स्वर आला आहे, म्हणजेच निमपट लय आहे. ज्या ठिकाणी एका मात्रेत दोन स्वर आहेत त्या ठिकाणी दुप्पट लय आहे. ज्या ठिकाणी एका मात्रेत तीन स्वर आले. तेथे तिप्पट लय, दीड मात्रेत एक स्वर आलेला आहे. पाच प्रकारच्या विविध आंतरिक लयींनी ही बंदिश सजलेली आहे. उठावाच्या दृष्टीने विशेष सौंदर्य प्राप्त ही बंदिश अंतर्गत लयीच्या सौंदर्याने सुध्दा संपन्न आहे. काव्यशब्दांच्या सहचार्यामुळे या बंदिशीच्या प्रत्येक आवर्तनातून तयार झालेले त्रितालाचे विविध आकृतीबंध पुढील प्रमाणे आहेत.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ओळ क्र.(1) | बिनती | मोरी | मान | श्याम | सुंदरवा | |
| | 3 | 2 | 4 | 3 | 4 | = 16 |
| ओळ क्र.(2) | परूं | तोरे | पैंय्याँ | जानेदे | घरवा | |
| | 2 | 3 | 4 | 4 | 3 | = 16 |
| ओळ क्र.(3) | जाने | कैसे | कैसे | लोगवा | बोले | |
| | 2 | 3 | 4 | 4 | 3 | = 16 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ओळ क्र.(4) | हठ | छोड | छोड | अब | बिलम | भइलवा | |
| | 2 | 3 | 2 | 2 | 3 | 4 | = 16 |

वरील विश्लेषणावरुन हे लक्षात येते की, या बंदिशीमध्ये त्रितालाचे चार आकृतीबंध वेगवेगळया वजनांचे आलेले आहे. ज्यामुळे या बंदिशीचे लय सौंदर्य अधिक बहरुन आलेले आहे.

*निष्कर्ष —*

काव्य, स्वररचना, मुखडा, सम आणि लय सौंदर्य या सर्व निकषांवर प्रस्तुत बंदिशीचे समिक्षण केले असता पुढील निष्कर्श प्राप्त होतात.

1.साहित्यीक दृष्टया या बंदिशीचे काव्य जरी साधारण असले तरी सांगीतिक आणि गायनाभिव्यक्तीसाठी हे काव्य उत्तम प्रतिचे आहे. रागाच्या अभिव्यक्तीकरीता योग्य असा रस परिपोषक आहे. विषय अर्थवाही, सुगम आणि उच्चारसुलभ शब्द योजना, तसेच गायनानुकुल स्वरव्यंजनांची मांडणी या सर्व गुणांनी युक्त ही बंदिश आहे.

2.स्वर प्राधान्याच्या दृष्टीने परंपरेने चालत आलेल्या वादी स्वराला या बंदिशीने फाटा दिला असला तरी रागाच्या प्राकृतिक स्वरुपाला यामुळे कुठेही नुकसान झालेले दिसत नाही. मुखडा बांधतांना तालातील मात्रांचा व शब्दांचा सुंदर समन्वय साधण्यात आला आहे. समेसाठी आकार युक्त शब्द व संवादी स्वर यांची निवड करुन रागालापी सुलभ करण्यात आली आहे.

3.उठावाच्या बाबतीत वेगळेपण जपणाऱ्या या बंदिशीत अंतर्गत लय सौंदर्य पाच प्रकारच्या लयींच्या विविधतेने नटलेले आहे. तसेच शब्दांच्या सहचार्याने या बंदिशीच्या चारही ओळींमधून साकार झालेले चारही आकृतीबंध श्रोत्यांना मंत्रमुग्ध करुन टाकणारे आहेत.

4.शिवरंजनी या रागातील ही बंदिश कुमूदताईंच्या रागाभ्यास आणि रचना—कौशल्याची साक्ष पटविणारी एक उच्चप्रतीची बंदिश आहे.

*संदर्भ सूची :—*

1.W.W.W. S.G.B.A.U. Shodhganga.com
2.''कहत गुनीजन'' बंदिश संग्रहः डॉ. साधना शिलेदार, विजय प्रकाशन, प्रथमावृत्ती. 9 सप्टेंबर 2013.
3.''भारतीय संगीतातील दोन रंग,सदारंग—अदारंग'' स्मिता पतंजलि मादुस्कर, सुनिधी पब्लिशर्स, प्रथमावृत्ती — नोंव्हेंबर 2014
4.''घरंदाज गायकी''—पं.वा.ह.देशपांडे, मौज प्रकाशन, पृ. 34—35
5.प्रा. कुमूदताईंचे शिष्य श्री. आल्हाद आळशी यांचा घेतलेला साक्षात्कार.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org